**<u>ठळक बातम्या</u>**

- जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांचं आरक्षण जाहीर

- एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना ६ हजार रुपये बोनस जाहीर

- वेस्ट इंडिजविरुद्धची दुसरी कसोटी जिंकण्यासाठी भारताला ५८ धावांची गरज

**आणि**

- नैऋत्य मौसमी पावसाची राज्यातून पूर्णपणे माघार

**<><><><><>**

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या आगामी निवडणुकीसाठी आज विविध जिल्ह्यात आरक्षण सोडत जाहीर झाली. याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून.....

**---------व्हीसी--------**

*(पुणे जिल्हा परिषदेतल्या ७३ गटांपैकी सात जागा अनुसूचित जातीसाठी, पाच जागा अनुसूचित जमातीसाठी, तर १९ जागा इतर मागास प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. नाशिक जिल्हा परिषद निवडणुकीसाठी ७४ पैकी ३७ गट महिलांसाठी राखीव आहेत, दहा जागा इतर मागास प्रवर्गातल्या महिलांसाठी, ९ जागा सर्वसाधारण प्रवर्गातल्या महिलांसाठी, १५ अनुसूचित जमातीतल्या महिलांसाठी तर तीन जागा अनुसूचित जातीतल्या महिलांसाठी आरक्षित आहेत. सांगली जिल्हा परिषदेतल्या ६१ जागांसाठीही आरक्षण सोडत काढण्यात आली.*

*अहिल्यानगर जिल्हा परिषद निवडणुकीसाठी ७५ गटांपैकी इतर मागास प्रवर्गासाठी २०, अनुसूचित जातीसाठी ७ तर अनुसूचित जमातीसाठी ९ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. नंदुरबारमधल्या ५६ गटांपैकी एक जागा अनुसूचित जातीसाठी, ११ जागा इतर मागास प्रवर्गासाठी तर ४४ जागा अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असतील. धुळे जिल्हा जिल्हा परिषद निवडणुकीसाठी ५६ गटांपैकी २३ जागा अनुसूचित जमातीसाठी, ३ अनुसुचित जाती तसंच १५ जागा इतर मागास प्रवर्गासाठी राखीव आहेत.*

*बीड जिल्हा परिषदेतल्या ६१ गटांपैकी सोळा गट इतर मागास प्रवर्गासाठी ऱाखीव आहेत, यातील आठ गट महिलेसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत.  छत्रपती संभाजी नगर जिल्हा परिषदेतल्या ६३*

*जागांपैकी १७ जागा इतर मागास प्रवर्गासाठी आरक्षित आहेत. तर अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आठ जागा राखीव आहेत.)*

<><><><>

राज्यातल्या नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी प्रभागनिहाय प्रारुप मतदार याद्यांवर हरकती आणि सूचना नोंदवण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने १७ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी येत्या ३१ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध केली जाईल.

**<><><><>**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भाजपाकडून विभागवार बैठका सुरू आहेत. त्यानुसार आज अमरावती विभागाची बैठक झाली. शक्य तिथे महायुती म्हणून निवडणूक लढवण्याला पक्षाचे प्राधान्य आहे. मात्र त्याचा निर्णय स्थानिक पातळीवर घेतला जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले…

**होल्ड - फडनवीस बाइट**

**<><><><>**

महाविकास आघाडीत मनसेला सामावून घ्यायला काँग्रेसनं विरोध केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज मुंबईत काँग्रेस पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यात मुंबई महापालिकेची निवडणूक एकट्यानं लढवण्याची मागणी नेत्यांनी एकमतानं केली. कुठल्याही जागेवर मैत्रीपूर्ण लढत करण्याचा काँग्रेसचा विचार नसल्याचं मुंबई प्रदेशाध्यक्ष वर्षा गायकवाड यांनी या बैठकीनंतर वार्ताहरांना सांगितलं.

**<><><><>**

एसटी महामंडळाच्या ८५ हजार कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून सहा हजार रुपये सानुग्रह अनुदान तसंच सणाची उचल म्हणून साडे बारा हजार रुपये देण्याचा निर्णय सरकारने घेतल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी

सांगितलं. एसटी कर्मचारी संघटनांची आणि कृती समितीची बैठक मुंबईत आज झाली, त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. साडे सहा हजार पगारवाढीची थकित रक्कम देण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी ६५ कोटी रुपये खर्च येणार असल्याचं शिंदे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यातून होणारी निर्यात दहा पटीनं वाढवण्यासाठी१२ नवीन धोरणं आणली जात असल्याचं उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज सांगितलं. या धोरणांमुळे उद्योजकांना दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गेल्या तीन वर्षांच्या "महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्कारां"चं वितरण सामंत यांच्या हस्ते झालं. त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली.

महाराष्ट्राला उद्योग क्षेत्रात कायमस्वरूपी ‘एक नंबर’ वर ठेवण्यासाठी आवश्यक ती ताकद उद्योजकांना देण्याची राज्य शासनाची तयारी आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली. निर्यात वाढीसाठी उत्कृष्ट कार्य केलेल्या रत्नागिरी, नागपूर, गडचिरोली आणि लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना, यावेळी प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानित करण्यात आलं.

**<><><><><>**

वेस्ट इंडिजविरुद्धचा दुसरा कसोटी सामन्यात विजयासाठी भारताला आणखी ५८ धावा कराव्या लागणार आहेत. फॉलोऑननंतर आज चौथ्या दिवशी वेस्ट इंडिजनं पहिल्या डावातली पिछाडी भरून काढली, आणि दुसऱ्या डावाअखेर १२० धावांची आघाडी घेतली. कालच्या २ बाद १७३ धावावरून वेस्ट इंडिजनं आज पुढं खेळायला सुरुवात केली. जॉन कॅम्पबेल आणि शाई होप यांनी तिसऱ्या गड्यासाठी १७७ धावांची भागीदारी करत वेस्ट इंडिजला डावाच्या पराभवाच्या नामुष्कीतून बाहेर काढलं. कॅम्पबेलनं ११५, तर शाई होपनं १०३ धावा केल्या. ३९० धावांवर त्यांचा डाव संपला.

भारतातर्फे या डावात कुलदीप यादव आणि जसप्रित बुमराहनं प्रत्येकी ३, तर महंमद सिराजनं २ गडी बाद केले.

दुसऱ्या डावात फलंदाजीला उतरलेल्या भारताचा सलामीवीर ८ धावांवर बाद झाला. सध्या केएल राहुल २५ आणि साई सुदर्शन ३० धावांवर खेळत आहे.

<><><><><>

येवला मुक्ती भूमी धर्मांतर घोषणा दिनाच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने मंत्री छगन भुजबळ यांनी आज येवला मुक्तीभूमी येथे भगवान गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केलं. बाबासाहेबांनी १९३५मध्ये आजच्याच दिवशी येवल्यातून धर्मांतराची घोषणा केली होती.

<><><><><>

आरपीएफ अर्थात रेल्वे पोलीस दलातल्या पदांसाठी यापुढे कर्मचारी निवड आयोगाद्वारे भर्ती केली जाईल, अशी घोषणा रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली आहे. गुजरातमध्ये वलसाड इथे रेल्वे पोलीस दलाच्या एकेचाळीसाव्या स्थापना दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी आरपीएफशी संबंधित विविध उपक्रमांचा प्रारंभ केला.

येत्या दिवाळी आणि छट पूजेसाठी रेल्वे १२ हजार विशेष गाड्या चालवणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन सेवेच्या बिलिमोरा या स्थानकालाही अश्विनी वैष्णव यांनी भेट दिली आणि तिथल्या कामाचा आढावा घेतला. बुलेट ट्रेन सेवेचा बिलीमोरा ते सूरत हा पहिला टप्पा २०२७मध्ये कार्यान्वित होईल, अशी माहिती त्यांनी नंतर बातमीदारांशी बोलताना दिली.

<><><><><>

नाशिकच्या सातपूर इथं डिझेल डब्याचा स्फोट होऊन झालेल्या दुर्घटनेतील मृतांची संख्या चार झाली आहे. हा अपघात गेल्या आठवड्यात सातपूर विभागात महादेववाडी इथं झाला होता. अपघातात सहा जण जखमी झाले होते. गंभीर जखमी

झालेल्या चौघांवर मुंबईतल्या केईएम रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एकाच कुटुंबातील तिघांचा समावेश आहे.

<><><><>

नंदुरबार जिल्ह्यात अक्कलकुवा तालुक्यातल्या मोरंबा गावात अवैध दारू निर्मितीचा कारखाना पोलिसांनी उद्धवस्त केला. पोलिसांनी घातलेल्या छाप्यात सुमारे ३० लाखांचा मुद्देमाल जप्त केला. यावेळी पाच जणांना अटक करत त्यांची रवानगी कोठडीत केली आहे.

<><><><>

ऊस तोडणीच्या कामाला जाण्यासाठी उचल घेत त्यामोबदल्यात मुलीचा बालविवाह करण्याचा प्रयत्न सामाजिक संघटनांच्या सतर्कतेनं थांबवण्यात आला. बीड जिल्ह्यात मुर्शदपूर इथं अल्पवयीन मुलीचा बालविवाह होणार असल्याची माहिती राजर्षी शाहू महाराज प्रतिष्ठानला मिळाली. त्यांनी बीड ग्रामीण पोलिस आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या मदतीनं हे लग्न रोखलं.

<><><><>

२०२५साठीचा अर्थशास्त्रासाठीचा नोबेल पुरस्कार जुएल मोकीर, फिलिप आगियों आणि पीटर हॉविट यांना जाहीर झाला आहे. तंत्रज्ञान किंवा नवोन्मेषामुळं कशारितीनं आर्थिक प्रगती होऊ शकते याबद्दल मोकीर यांनी संशोधन केलं. त्यांना या पुरस्कारातली अर्धी रक्कम दिली जाईल. उर्वरित अर्धी रक्कम इतर दोघांमध्ये वाटली जाईल. नवीन वस्तू किंवा तंत्रज्ञान बाजारात आल्यावर जुन्या गोष्टी बाजारपेठेतून काढून टाकल्या जातात. याविषयावर आगियो आणि हॉविट यांनी लेख लिहिला होता. त्याबद्दल हा पुरस्कार दिला जात असल्याचं नोबेल समितीनं म्हटलं आहे.

<><><><>

नांदेड जिल्ह्यातल्या विविध पोलीस ठाणे हद्दीतून हरवलेले दीडशे मोबाईल स्थानिक गुन्हे शाखा आणि सायबर पोलिसांनी जप्त केले आहेत.

**<><><><><>**

नैऋत्य मौसमी पावसानं राज्यातून पूर्णपणे माघार घेतली असल्याचं हवामान विभागानं जाहीर केलंय. राज्यातला मान्सूनचा माघारीचा प्रवास आज पूर्ण झाला. आता केवळ दक्षिण भारत आणि ओडिशातून मान्सूनची माघार शिल्लक आहे.

गेल्या चोवीस तासात संपूर्ण राज्यात हवामान कोरडं होतं. येत्या दोन दिवसात राज्याच्या चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात तुरळक ठिकाणी ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**